# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड
# १४ वे गिरिमित्र संमेलन ९-१० जुलै २०१६
# मध्यवर्ती संकल्पना - गिर्यारोहण आणि महिला

डोंगर हे अनेक कारणांनी अनादी काळापासून आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत. पण केवळ हौस छंद म्हणून डोंगर चढण्याची सुरुवात झाली ती १७८६ मध्ये मॉँट ब्लॉंक या युरोपातील सर्वोच्च शिखरावर आरोहणानंतर. गिर्यारोहणाचा शास्त्रशुद्ध विकास झाला तो युरोपात. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपात महिलांनी गिर्यारोहणाच्या क्षेत्रात प्रवेश केला.
तेथून ते वारे नगाधिराज हिमालयापर्यंत पोहोचलं ते साधारण १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात. मात्र भारतीयांना या क्रीडा प्रकाराचं वेड लागलं ते १९५३ साली सर्वोच्च हिमशिखर एव्हरेस्टवरील पहिल्या यशस्वी आरोहणानंतर.
तुरळक प्रमाणात महाराष्ट्रातील काही तरुण डोंगर भटकू लागले होते. पण त्याला संस्थात्मक वाटचालीची जोड मिळाली मुंबईतील काही महाविद्यालयांतील उत्साही तरुण प्राध्यापकांमुळे. त्यांनी एकत्र येऊन १९५४ साली सुरु केलेल्या 'इंटर कॉलेजिएट हायकर्स क्लब'मुळे महाविद्यालयीन तरुण-तरुणींना खऱ्या अर्थाने डोंगरभटकंतीला उद्युक्त केलं. याच दरम्यान १९५५ साली मुंबईत सुरु झालेल्या पारसी पायोनिअर्सच्या माध्यमातून महिलांना डोंगर भटकंतीचा आनंद घेत होत्या.
१९५९ पर्यंत मात्र महाराष्ट्रात गिर्यारोहणाचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळण्याची सोय नव्हती. हिमालयन क्लबच्या मुंबईतील काही धडपड्या तरुणांनी 'माऊंटेनिअरिंग कोर्स स्पॉन्सरींग कमिटी'ची स्थापना करून, हिमालयीन इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरिंगमधील शेर्पाच्या मार्गदर्शनाखाली मुंब्र्याच्या डोंगरात प्रस्तरारोहणाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. पुढे जवळजवळ दशकभर ह्या उपक्रमात अनेक महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रस्तरारोहणाचे धडे गिरवित होत्या.
१९६१ साली जगदीश नानावटी यांनी आखलेल्या निलगिरी पर्वत मोहिमेत त्यांच्या पत्नीदेखील त्यांच्याबरोबर होत्या. १९६२ साली मुंबईत क्लाईम्बर्स क्लबची स्थापना करण्यात पुरुषांच्या बरोबरीनेच सौ. चारी यांचादेखील सहभाग होता.
एव्हाना दार्जिलिंग येथील १९६१ मध्ये हिमालयन इन्स्टिट्यूट ऑफ माऊंटेनिअरींग या संस्थेतून महिलांची पहिली तुकडी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडली होती. पुरुषांच्या जोडीनेच महिलादेखील गिर्यारोहण मोहिमांमध्ये भाग घेऊ लागल्या.
महाराष्ट्रातूनदेखील अनेक तरुण-तरुणी गिर्यारोहणाचं प्रशिक्षण घेत होत्या आणि हिमालयात भ्रमंती करत होत्या. त्यांच्या गिरिभ्रमणाची वर्णनं वृत्तपत्रांतून प्रकाशित होत होती. पण १९६६ पर्यंत हिमालयीन शिखर मोहिमा महाराष्ट्रातून आखल्या गेल्या नव्हत्या. १९६३ मध्ये एका संमिश्र चमूबरोबर तीन गुजराती मुलींनी माऊंट कैलाशमधील म्हात्री शिखर सर केलं, तर १९६४ मध्ये सात भारतीय मुलींच्या टीमने जॉईसी या ब्रिटीश महिलेच्या नेतृत्वाखाली सर केलं.
१९६६ साली हनुमान पर्वतावरील गिरिविहारची मोहीम यशस्वी झाली. त्याच वर्षी पुष्पा आठवले यांच्या संपूर्ण महिलांच्या चमूने कोकथांग शिखरावर मोहीम आखली. मीना अग्रवाल आणि गिरा शाम या दोन मुंबईच्या तरुणींबरोबर प्रवीण शर्मा ही गुजरातमधील व दार्जिलिंगच्या लक्पा शेर्पा या तरुणींचा समावेश होता. त्यापूर्वी कोकथांगवर ज्या मोहिमा गेल्या होत्या त्यांनी २० हजार फूटांपर्यंतच आरोहण केलं होतं. पुष्पा आठवले यांच्या केवळ महिलांच्या चमूने शिखरमाथा गाठला नाही, पण वीस हजार १६० फूट उंचीपर्यंत आरोहण करुन कोकथांगची नवी उंची गाठली. पुरुषांच्या बरोबरीनेच महिलांनी स्वत:ला सिद्ध केलं होतं. पुरुष-महिला अशी स्पर्धा नव्हती, मात्र आपणदेखील अशा मोहिमा करू शकतो हा आत्मविश्वास या मोहिमेने महिलांना नक्कीच मिळवून दिला.
१९६८ मध्ये हिमाचल प्रदेशातील माऊंट कैलासवर आयोजित केलेल्या इंडो जापनीज लेडीज एक्सपिडीशनमध्ये डॉ. मीना अग्रवाल सहभागी झाल्या होत्या. १९७० मध्ये क्लाईम्बर्स क्लबमार्फत त्रिशूल पर्वतावर केवळ महिलांच्या चमूने मोहीम आखली. रेखा पारीख, पुष्पा आठवले, रेखा अग्रवाल या महिलांच्या चमूने डॉ. मीना अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली त्रिशूलवर मे-१९७० मध्ये यशस्वी आरोहण केलं. महाराष्ट्रातून त्रिशूलवर केलेलं ते पहिलेच यशस्वी आरोहण होतं.

महिलांची ही घोडदौड अशीच पुढे सुरू राहिली. याच दरम्यान डोंगरात भटकंतीचं वेड लागलेल्या उष:प्रभा पागे, विजया गद्रे, ललिता पाटील, के सरस्वती अशा अनेकांनी पुढे विविध उपक्रमांतून महिलांच्या गिर्यारोहणातील सहभाग वाढवण्याला चालना दिली, प्रोत्साहन दिले.

१९७४ साली गिरिविहारतर्फे आयोजित हनुमान पर्वतावरील केवळ महिलांच्या मोहिमेचे नेतृत्त्व ललिता पाटील यांनी केलं होतं. त्यामध्ये उष:प्रभा पागे यांचा सहभाग होता.

१९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष महाराष्ट्रासाठी अशीच विजयपताका घेऊन आलं. पुण्यातील भारत आऊटवर्ड पायोनिअर्स या संस्थेने जोगीन ३ या शिखरावर मोहीम आखली होती. डॉ. कुसुम सोहराब, पद्मा मेहता, विजया गद्रे, ललिता पाटील आणि नंदिनी नित्यानंद या महिलांच्या चमूने २० हजार ६५ फूट उंचीवरील ही मोहीम यशस्वी केली. मोहिमेच्या नेत्या डॉ. कुसुम सोहराब यांनी शिखर आरोहण केलं.

याच वर्षीच्या आणखी एका महत्त्वाच्या घटनेची नोंद घ्यावी लागेल. ती म्हणजे मुंबई-ठाण्यातील विजया गद्रे, ललिता पाटील, सुशिला अय्यंगार, मीना शानबाग, रजनी वाथे या काही तरुणींनी एकत्र येऊन लेडीज माऊंटेनिअरीगं क्लबची स्थापना केली. लेडीज माऊंटेनिअरींग क्लबकडून मुलकिला, देवतिब्बा अशा अनेक मोहिमा आखल्या गेल्या. केवळ महिलांचेच ट्रेक, हिमालयीन मोहिमा यामुळे महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन मिळत गेलं.

केवळ महिलांच्याच मोहिमामध्ये नाही तर इतर मोहिमांमध्येदेखील महिलांचा सहभाग वाढता होता. १९७८ साली पुणे माऊंटेनिअर्सतर्फे मुलकिला शिखर मोहिमेत उष:प्रभा पागे यांनी शिखरावर आरोहणं केलं. १९८० मध्ये विजय महाजन व अरुंधती जोशी या दोघांनीच कालिंदी शिखरावर मोहीम आखली होती. पण त्या मोहिमेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. आपल्या सहकाऱ्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लगेचच पुढच्याच वर्षी १९८१ मध्ये पद्मा मेहता आणि अरुणा साठे यांनी कालिंदी शिखरावर मोहीम आखली आणि त्यांच्या स्मृती जागवल्या.

१९८१ कॅप्टन बलवंत सिंधू आणि चंद्रप्रभा ऐतवाल यांच्या नेतृत्त्वाखाली नंदादेवी महत्त्वाकांक्षी मोहिमेत महाराष्ट्राच्या डॉ. कुमकुम सलुजा (खडालिया) आणि सुषमा महाजन या दोन गिर्यारोहकांचा समावेश होता. त्यापुर्वी सुषमा महाजन यांचा भारते खुंटा, कालिंदी, थारकोट  तर डॉ. खडालिया यांचा कालिंदी, साऊथ पर्वती व्हॅली पिक या मोहिमांमध्ये सहभाग होता.

याच काळात मुंबईतील ब्रिटी बर्डी या प्रस्तरारोहणात कारकीर्द घडवत होत्या. कोकिळा मेहता, नंदिनी पंड्या आणि स्वाती देसाई गिर्यारोहणातील अनेक उपक्रमांत सहभागी होत होत्या.

साधारण १९८२ ते २००० पर्यंतचा काळ हा अनेक अर्थांनी महाराष्ट्रातील गिर्यारोहणासाठी महत्त्वाचा म्हणावा लागेल. अनेक धुरिणांनी २५ वर्षांपूर्वी रूजवलेलं रोपटं चांगलंच फोफावलं होतं. महत्त्वाचं म्हणजे अनेक संस्थांच्या माध्यमातून त्याला चांगली बळकटी येत होती, आणि महिलांचा सहभाग दिवसेंदिवस वाढू लागला होता.

प्रस्तरारोहणाचा सराव आता सुळके आरोहणाकडे वळू लागला होता. अर्थात मुलीदेखील त्याकडे न वळत्या तर आश्चर्यच. १९७८ मध्ये उष:प्रभा पागे यांनी लिंगाण्यावर यशस्वी आरोहण केलं. प्रस्तरारोहणात एका महिलेचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. ते नाव म्हणजे नीता भोईर. कसलीही भीडभाड न बाळगता, स्त्री-पुरुष भेदभाव न करता रॉकवर ठामपणे उभं राहून एक प्रस्तरारोहक-प्रशिक्षक म्हणून नीताने अनेक प्रस्तरारोहक घडवले. इतकेच नाही तर १९८३ ते १९८६ दरम्यान तिने जोगीन, फ्रेंडशिप आणि स्वर्गरोहिणी अशा यशस्वी शिखरमोहिमांचे नेतृत्व केलं.

एकंदरीतच प्रस्तरारोहणच्या वाढीसाठी हा काळ पोषक होता. नाशिक येथील वैनतेय गिर्यारोहण गिरिभ्रमण संस्थेच्या सुषमा मराठे यांनी हडबीची शेंडी, डांग्या, अंजनेरी नवरा, संडे हे सुळके व धोडपची प्रस्तरभिंतीवरील आरोहण ८६ ते ९२ या काळात यशस्वी केलं. ज्योती शेट्ये यांनी ८३ नंतर युथ होस्टेल कांदिवलीच्या माध्यमातून हडबी, कळकराय, मांगी तुंगी, खडा पारसी अशा सुळक्यांवर आरोहण केली. तर ९० नंतरच्या काळात युथ होस्टेल कांदिवलीच्या भारती चाचड यांनी गणेश, वजीर, तेलबैला आदी सुळक्यांचा माथा गाठला.

प्रस्तरारोहणातील महिलांचा सहभाग तसा मर्यादितच म्हणावा लागेल असा होता. पण हिमालयीन मोहिमांमध्ये बरीच बाजी मारली होती. ८३ मध्ये पुण्यातील गिरिभ्रमण संस्थेच्या महिलांच्या चमूने जोगीन ३ हे शिखर सर केलं. यामध्ये सहभागी

असणाऱ्या सुषमा कट्टी यांनी पुढे कामेट, अबिगामिन, भृगुपंथ मोहिमेत सहभाग घेतला. तर १९९२ च्या एव्हरेस्ट मोहिमेत कॅम्प दोनपर्यंत आरोहण केलं. याच मोहिमेत सुप्रिया चक्रवर्ती यांनीदेखील कॅम्प दोनपर्यंत आरोहण केलं होतं.
सुशीला अय्यंगार, कुंदा कारभारी, संगिता माईणकर अशा महिला डोंगरात पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत होत्या. संगिता माईणकरने ८२ च्या आसपास सहकारी पुरुष गिर्यारोहकांच्या जोडीने बाजी मारली होती.
१९८४ सालच्या फक्त महिलांच्या चमूने एव्हरेस्ट मोहिमेत महाराष्ट्राच्या शरावती प्रभूचा समावेश होता. त्या मोहिमेतील ती सर्वात लहान सदस्य होती. साधारण या २० वर्षांच्या काळात इतर मोहिमा होत होत्या तशाच उष:प्रभा पागे, विजया गद्रे, के सरस्वती, विनिता मुनी यांसारखी, गिर्यारोहण हीच जीवनशैली मानणारी व्यक्तिमत्त्वं घडवली.
उष:प्रभा पागे यांनी वैयक्तिक कामगिरीबरोबरच पुण्यात समविचारी तरुणांबरोबर एकत्र येऊन 'गिरिप्रेमी' संस्थेची स्थापना करून गिर्यारोहणाच्या संस्थात्मक कार्यात योगदान दिलं आहे. १९८१ साली लियो पार्गीयाल मोहीम पुन्हा एकदा १९८२ मध्ये गिरिप्रेमी संस्थेसाठी यशस्वी केली. तर १९८३ मध्ये माना शिखर सर केलं. संपूर्ण महिलांच्या एव्हरेस्ट मोहिमेच्या सराव मोहिमेत त्यांनी गंगोत्री ३ शिखर सर केलं. १९८६ ची सतोपंथ शिखर मोहीम मात्र त्यांची परीक्षा पाहणारी होती. १९८५ च्या सतोपंथ शिखरावरील मोहिमेत अपघाती मृत्यू झालेल्या पतीचे व त्याच्या मित्रांचे मृतदेह शोधून काढून हिमपर्वतावरच त्यांच्यावर अंतिम संस्कार केले. या मोहिमेत त्यांच्याबरोबर विजया गद्रे, हिरा पंडीत व बाळा राऊळ यांचा समावेश होता.
लेडीज माऊंटेनिअरींग क्लब सुरू करून विजया गद्रे यांनी अनेक उपक्रम सुरू केलेच होते. १९९२ मध्ये चंद्रप्रभा ऐतवाल यांच्या नेतृत्वाखाली त्या संतोपंथ शिखर मोहिमेत सहभागी झाल्या होत्या.
याच दरम्यान के सरस्वती यादेखील अनेक संस्थांच्या माध्यमातून कार्यरत होत्या. कालिंदी, नून, गोलप कांग्री, स्वर्गरोहिणी, रूदुगैरा अशा मोहिमांचे त्यांनी नेतृत्व केलं आहे. १९९३ च्या इंडो नेपाळ महिला एव्हरेस्ट मोहिमेत त्या लॉजिस्टिक इनचार्ज होत्या. एक्सप्लोरर ॲण्ड ॲडव्हेंचर संस्थेच्या माध्यमातून त्यांनी अनेक महिलांना गिर्यारोहणाकडे वळवण्याचं महत्त्वाचं काम केलं आहे.
१९८४ पासून डोंगरात भटकणाऱ्या विनिता मुनीला हिमालयाने भुरळ पाडली. गेल्या पस्तीस वर्षांत तिने २५ हिमशिखरांवर मोहिमा केल्या आहेत. त्यापैकी नऊ शिखरं तर तोपर्यंत अस्पर्शितच होती. लाप्गो, छामसेर कांग्री, खांगशिलिंग, चामशेर कांग्री अशा अनेक शिखरांचा समावेश होतो. १९९८ साली सियाचेन ग्लेशियर पार करुन भारताचे उत्तरेकडील शेवटचं टोक म्हणजे इंदिरा कोल गाठलं. तर १९९७ मध्ये केवळ चार महिलांच्या चमूने तिने केलेल्या ट्रान्स हिमालय ट्रेकची विशेष नोंद घ्यावी लागेल. अरुणाचल ते जम्मू काश्मिरमधील पूर्व काराकोरम पासपर्यंत तब्बल ४५०० किलोमीटरचा खडतर ट्रेक विनिताने यशस्वी केला. असा ट्रक केलेली ती महाराष्ट्रातील पहिलीच महिला आहे.
साधारण २००० नंतरचा काळ हा गिर्यारोहण क्षेत्रात अनेक स्थित्यंतरं आणणारा होता. संस्थात्मक वीण नाही म्हटली तरी काहीशी उणावली. तर दुसरीकडे व्यापारी उपक्रमांची संख्या वाढू लागली. हिमालयीन मोहिमांमध्ये तुलनेनं एव्हरेस्टकडे कल वाढू लागला. पण त्याचबरोबरीने स्वत:च्या पायावर उभ्या राहिलेल्या नव्या पिढीतील मुलींची संख्या वाढू लागली.
याच काळात काही तरुणींनी मात्र प्रस्तरारोहणात अगदी सातत्य राखलं आहे. वैशाली राणे आणि पल्लवी वर्तक या दोघींनी चक्क सुळके आरोहणाचं शतक पार केलं आहे. वैशालीने शैलभ्रमर संस्थेच्या माध्यमातून २९ अजिंक्य सुळक्यांसह १३५ सुळक्यांवर यशस्वी आरोहण केलं आहे. तर पल्लवी वर्तकने शैलभ्रमरच्या माध्यमातून २६ अजिंक्य सुळक्यांसह ९७ सुळक्यांवर आरोहण केलं. तर नंतर निसर्ग मित्र व इतर संस्थांबरोबर सुळके आरोहणाचं शतक पार करत आजवर १३० सुळके सर केले. पल्लवीच्या या कामगिरीबद्दल तिला छत्रपती पुरस्कारानेदेखील गौरवण्यात आलं आहे.
शीतल करंबे हिने नऊ वर्षांच्या कालावधीत कळकराय, महालक्ष्मी, अंजनेरी नवरा, ड्यूक्स नोज, सरसगडची वरची वॉल, इर्शाळगड, गणेश, लिंगाणा, तेलबैला (आतली बाजू), कालगोंडा, माहुली वजीर, कार्तिक, माहुली भालदार, डांग्या असे बावीस सुळके आरोहण केलं आहे. एका रस्ता अपघातात तिचा मृत्यू झाल्याने तिची कारकीर्द खंडीत झाली.

ह्याच काळात अनेक संस्थांतून महिला दिनाचे ट्रेक आयोजित केले जायचे. पण २०१२ मध्ये प्रिसिलिया मदन, वैशाली हळदवणेकर, भारती चाचड, गौरी बोईड, सुप्रिया चक्रवर्ती आणि पल्लवी वर्तक या महिलांनी एकत्र येऊन तेलबैलावर आरोहणाचा उपक्रम यशस्वी केला.

अर्थातच गेल्या काही वर्षांत विविध संस्थांमधून महिलांचा प्रस्तरारोहणातील सहभाग वाढलेला आहे. पंधरा-वीस वर्षांत दीपाली बिरादर, प्रियांका चिंचोळकर, धनश्री लेकुरवाळे, इशा कुलकर्णी, हमिदा खान, अंजू पनिकुलम, गौतमी देशपांडे, अदिती गाडगीळ, बिंदा देशमुख, संगीता वडस्कर, शलाका वारंगे, शैला वाणी, नीलम ठाकूर जळवी, साधना वीरकर, ज्योती कानेटकर, पल्ल्वी भोर, खुशी कंबोज, त्रिवेणी केसरकर, नेहा शेट, वर्षा लागू, इशानी सावंत, प्राजक्ता घोडे अशा किमान २०-२५ मुली प्रस्तरारोहणात सहभागी झाल्या होत्या. बाण, वानरउडी, ईर्शाळ, तेलबैला, लिंगाणा, हडबी, भवानीकडा, टकारा, कळकराय, माणिकची लिंगी, न्हावीन, अंजनेरी नवरा नवरी, सरसगड वॉल, गणेश, कालगोंडा, माहुली वजीर, कार्तिक, भालदार, डांग्या, ढाक, पहिनेचा नवरा, संडे, धोडप वॉल, मांगी तुंगी, खडा पारशी, भैरवगड, कलावंतीण, हॉट डॉग, लुईजा, ड्यूक्स, कणगा, टकमक, तेलिण, काकडमाळ लिंगी, सिद्धगड लिंगी, नानाचा अंगठा असे तीस-चाळीस  सुळके या मुलींच्या खात्यावर जमा झाले आहेत.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातून हिमालयीन मोहिमांचे प्रमाण तसे कमी असलं तरी पंधरा एक महिला गिर्यारोहक नेटाने वाटचाल करताना दिसतात.  स्टोक कांग्री, गंगोत्री ३, माऊंट नून, चमशेर कांग्री, लालूंग व्हॅली एक्सपिडीशन, रूदगैरा, जोगीन ३, फ्लूटेड पिक, माऊंट सीबी १३, माऊंट  युनाम, माऊंट सुझत्लिा, माऊंट कांगला तार्बो, देवतिब्बा, नोर्बू, जांबू पिक, कालानाग, केदारडोम, पातालसू, हनुमान तिब्बा, सेव्हन सिस्टर्स, काला पत्थर, नामार्जुंग, ग्योक्यो री, थेलू कोटेश्वार, मुलकिला, माउंट कामेट अशा शिखरांवरील मोहिमेत तन्वी गाडगीळ, प्रियांका चिंचोळकर, अंजू पनीकुलम, गौतमी देशपांडे, अदिती गाडगीळ, संगीता वडस्कर, मनिषा वाघ, ज्योती शेट्ये, माणिक बिस्वास, समृद्धी भुतकर, इशानी सावंत, प्राजक्ता घोडे अशा महिलांचा समावेश होता. अर्थात त्यातदेखील नावीन्याची वाट पकडत विनिता मुनी आजदेखील अस्पर्शित शिखरं सर करत आहेत. २०१५ मध्ये रस्सा ग्लेशियरमधील पाच अस्पर्शित शिखरं तिने यशस्वीरित्या आरोहण केली आहेत.

अर्थात सुळके आरोहणातील ही प्रगती तुलनेने हिमालयीन मोहिमांमध्ये कमीच आहे. पण अलिकडच्या काळात कृष्णा पाटील आणि प्रियांका मोहिते यांनी एव्हरेस्टवर महाराष्ट्रातील महिलांचं नाव कोरलं.

ट्रेकला येणाऱ्या मुलींची संख्या दिवसेंदिवस वाढणारीच असली तर काही तरी ध्येय ठेवून किल्ले भटकणारी हमिदा खान सारखी एखादीच. १९९८ मध्ये रायगडावर अप्पा परब यांच्या व्याख्यानातून प्रेरणा घेऊन हमिदाने महाराष्ट्रातील यच्चयावत किल्ल्यांना भेटी द्यायला सुरुवात केली. कोणी सोबत असेल तर ठीक नाही तर थेट एकटीनेच तिची ही भटकंती सुरु ठेवली. आत्तापर्यंत तिने तब्बल ३८५ किल्ल्यांवर भटकंती केली आहे. इतिहासाच्या प्रेरणेतून तिने केलेली कामगिरी सर्वच महिलांसाठी प्रेरणादायी म्हणावी लागेल.

महिलांच्या गिर्यारोहणातील कारकिर्दीचा आढावा हिमालयीन शिखरे आणि प्रस्तरारोहण या माध्यमातून घेतला असला तरी त्यांच्या संस्थात्मक कामातील योगदानाशिवाय तो पूर्ण होणार नाही. बऱ्याचवेळा संस्थात्मक कार्य हे पडद्यामागचे आणि अनेकदा नीरस आणि वेळखाऊ असते. तरीदेखील अनेक कार्यकर्ते हे काम नेटाने पुढे नेत संस्थेच्या वाटचालीत मोलाचा वाटा उचलतात. शिबिरांचे आयोजन, संस्थेच्या गिरिभ्रमण मोहिमा, प्रदर्शन व इतर कार्यक्रम यामध्ये महिलांचा महत्वाचा सहभाग राहिला आहे. चक्रम हायकर्सच्या मैत्रीय भट आणि सुखदा भिडे, गिरिसंचारच्या संगिता वडस्कर, सह्याद्री मित्र महाडच्या शलाका वारंगे, वैनतेय गिरिभ्रमण नाशिकच्या सुषमा मराठे, शैला वाणी, वाएचए कांदिविलीच्या भारती चाचड, ज्योती शेंडे, वायएचए अंधेरीच्या वरदा कोतवाल शेंडे, वायएचए अमरावतीच्या प्राची पालकर, गिरिविंहगच्या नीलम ठाकूर जळवी, साधना वीरकर, निसर्गमित्रच्या गायत्री बोईड, ज्योती कानेटकर, वायएचए अंबरनाथच्या अनघा लेले, अपर्णा भट्टे, ट्रेकक्षितिजच्या प्राजक्ता महाजन, सीमा भारांबे-बोरोले आणि निमिषा जोशी, महाबँक ट्रेकर्सच्या अमृता फोपे, सीमा आपटे, रंजना लिमये, अतुला शेलगावकर, संपदा घाडी, श्रद्धा घाडी, अंजनी बारटक्के, नीना बने, स्मिता खाडे, राणी नाईक, मानसी सावंत, रश्मी कवाड, सलोनी पडोळे, आशा गवाड, शेफाली मोरे, अनुपमा पेडणेकर आणि माधवी पडोळे, नेचर लव्हर्सच्या दिपा वाळवेकर, विशाखा

पाटील, अश्विनी नाटेकर, रश्मी नाईक, दिपाली पेंडसे आणि मंजु सावला या सर्व महिला गिर्यारोहकांच्या योगदानामुळे महाराष्ट्रातील संस्थात्मक वाढीला बळकटी मिळाली आहे.

ही झाली डोंगरात धडपडणाऱ्या महिलांची गौरवगाथा. पण गेल्या पन्नास वर्षात असंख्य पुरुष गिर्यारोहकांना सक्रिय पाठींबा देणारी त्यांची आई, बहीण, पत्नी, मुलगी यांचे योगदानदेखील महत्वाचे आहे. काहीना आपला मुलगा, भाऊ, पती, वडील गमवावे लागले आहेत. अशाच सर्वच महिलांना समस्त गिर्यारोहकांचा सलाम.

महाराष्ट्रातील महिलांच्या गिर्यारोहणाच्या वाटचालीचा हा एकंदरीत आढावा. पुरुष - महिला अशी स्पर्धा, भेदाभेद असं खुल्या निसर्गात काहीचं नसतं. पण महिलांच्या वाटचालीत शाररिक, मानसिक आणि सामाजिक अडथळयांनी ही वाट कधी कधी बिकट होत असते. ती वहिवाट व्हावी हीच या संमेलनाच्या निमित्ताने आशा करुया.

जय हिंद, जय महाराष्ट्र

----समाप्त---